तरुण भारत

# विसर्जनाकरता तलावाच्या ठिकाणी १५ बुथ

## दानशुर व्यक्तींचा उपक्रम

### नगराध्यक्षा माधवी कदम यांच्या हस्ते विसर्जन बुथचा शुभारंभ

प्रतिनिधी
सातारा

गणेश चतुर्थी हा सण संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे, तर देशात हर्ष आणि उल्हासात साजरा केला जातो. हा सण साजरा होत असताना अलिकडे अनेक बंधने येवू लागली आहेत. बंधनातूनही आपल्या परंपरा, संस्कृती जपणारी थोडीच माणसे आढळून येतात. विसर्जन बुथ सुरु करण्याची संकल्पना सुयश नीलेश लाहोटी यांच्या संकल्पनेतून आली आणि सातारा पालिकेच्या पोहण्याच्या तलावाच्या ठिकाणी तब्बल १५ विसर्जन बुथ तयार करण्यात आले आहेत. दानशुर व्यक्तींनी सहकार्य केले आहे.

एल.एम.एन.मीडियाचे संस्थापक मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच एम.आय.टी विश्वशांती विद्यापीठाचे विद्यार्थी सुयश नीलेश लाहोटी यांच्यातर्फे वेगण उपक्रम राबवण्यात येत आहे. या उपक्रमानुसार एल.एम.एन मीडिया साताऱ्यात गणपती विसर्जनासाठी नेमलेल्या जागेवर म्हणजेच,



सातारा : विसर्जन बुथचा शुभारंभ करताना नगराध्यक्षा माधवी कदम व इतर.

सातारा पालिकेच्या पोहण्याचे तलाव येथे जागोजागी विसर्जन बुथ स्थापन करण्यात आले आहेत. जेणेकरुन गणपतीची मूर्ती ठेवण्यास जागा उपलब्ध करून दिली आहे. मूर्तीची सांगता आरती आदर व सन्मानाने पार पाडावी, तसेच भक्तांचे आणि भाविकांच्या भावनांचाही आदर व्हावा आणि गणपतीच्या आरतीसाठी

**स्तुत्य संकल्पना..**

- पोहण्याचे तलावालगत विसर्जन बुथ स्थापन
- मूर्तीची सांगता आरती सन्मानाने पार पाडावी
- लाहोटी यांची संकल्पना

उपयोगात येणाऱ्या वस्तू जसे कापूर, फळे, नारळ आदी वापरुन झाल्यावर तो कचरा लोक पाण्यात फेकून देतात ज्याने आसपास घाण व कचरा पसरतो हा सगळा अनर्थ टाळता यावा म्हणून जाहीर उपक्रम राबवत असून १५ बुथ लावण्यात आले आहेत. मिताली कलेक्शन, दर्शन, सातारा लाईट्स, एलएमएन मीडिया, बालाजी मोबाईल्स, चंद्रविलास, एन. जीवराज, न्यू राजपुरोहित यांच्याकडून करण्यात आले आहे. दीड दिवसांच्या गणेश विसर्जनावेळी प्रतिसाद मिळाला.